

# -: संत श्री. नरहरी सोनार :-

'हरि-हराची एकरूपता' पटवून देण्यासाठी या भूतलावर अवतीर्ण झालेले संत म्हणजे 'श्री नरहरी सोनार'. श्रावण महिन्यातल्या शुक्ल पक्षाच्या त्रयोदशीला श्री महाराजांचा पंढरपुरात जन्म झाला. त्यांचे घराणे पेशाने सोनार होते. शिवभक्ती ही त्यांच्या घरी परंपरेने चालत आली होती. परिणामतः संत नरहरी सोनार हेही परम शिवभक्त होत. त्यांची भक्ती अत्यंत उच्च कोटीची होती. आयुष्याच्या सुरुवातीच्या काळात ते एकनिष्ठ शिवभक्त असल्याने इतर देवांची आराधना करत नसत.

दरम्यानच्या काळात तेथील सावकारास नवसाने पुत्रप्राप्ती झाल्याने पांडुरंगासाठी कमरेची सोनसाखळी करायची होती. त्यासाठी ते नरहरी सोनारांकडे आले. परंतु शंकराशिवाय इतर देवतांचे मुख न पाहण्याचा त्यांचा पणं असल्याने त्यांनी या करिता नकार दिला. त्यावर उपाय म्हणून सावकारानेच त्यांना माप आणून दिले. मापानुसार नरहरी सोनारांनी सोनसाखळी तयार केली. सावकारानेही मोठ्या आनंदाने ती साखळी मंदिरात जाऊन विठ्ठलाला घातली. पण ती एक वीतभर जास्त झाली. तेंव्हा सावकाराने ती साखळी नरहरी सोनारांकडे जाऊन कमी करून आणली. परंतु पुन्हा साखळी एक वीत जास्तच झाली. त्यामुळे आणखी एकदा सावकार साखळी कमी करण्यासाठी नरहरींकडे आला. याप्रकाराने नरहरी गोंधळून गेले. शेवटी यावर उपाय म्हणून स्वतःच्या डोळ्यावर पट्टी बांधून श्री नरहरी सोनार स्वतः विठ्ठलाच्या मंदिरात

गेले. मूर्तीपाशी जाऊन जेंव्हा ते सोनसाखळी पांडुरंगाच्या कमरेभोवती बांधू लागले तेंव्हा त्यांच्या हाताला व्याघ्रचर्मे लागली. आश्चर्य वाटून त्यांनी हात गळ्याभोवती नेले असता मूर्तीच्या गळ्यात शेषनाग असल्याचे त्यांना जाणवले. लगेचच त्यांनी आपल्या डोळ्यावरील पट्टी काढली. बघितले तर सोनार विठ्ठलाची मूर्ती होती. पुन्हा त्यांनी पट्टी बांधली तर हाताला मात्र शिवरूप जाणवले. याप्रकाराने गोंधळून गेलेल्या नरहरींना साक्षात्कार झाला की परब्रह्म श्री. पांडुरंग हेच परमात्मा श्री शंकर आहेत, हरि आणि हर यात भेद नाही.

या घटनेनंतर “देवा तुझा मी सोनार | तुझ्या नामाचा व्यवहार ||” असे म्हणत ते विठूरायाच्या भक्तीत आकंठ बुडून गेले. संत साहित्यात त्यांच्या उपलब्ध असलेल्या अश्या कित्येक अभंगांमध्ये त्यांनी विठूरायाची आळवणी तसेच सर्वसामान्यांना मोलाचे मार्गदर्शन केलेले दिसते. आपला उर्वरित जीवनमार्ग त्यांनी विठ्ठलमय करून टाकला. त्यामुळे प्रपंच्यासंबंधी लवकरच ते अगदी अनासक्त होऊन ब्रम्हस्थितीला जाऊन पोहचले. नरहरींनी माघ कृष्ण तृतीयेस विठ्ठल नामात पंढरपुरी त्याच्याच मंदिरासमोर समाधी घेतली.

- चि. हिमांशु देवभूषण आफळे.

व्यक्तिरेखा -

१. विठ्ठल - श्री. सुर्यकांत कुलकर्णी.
२. नरहरी सोनार - श्री. आशुतोष गोळे.
३. पुजारी - श्री. सागर जोशी.

नेपथ्य -

१. श्री. शंतनू देशमुख.
२. श्री. अद्वैय मुंढे.
३. श्री. आमित पाटील.
४. श्री. महेश पुजारी.
५. श्री. ओमकार पाटील.
६. श्री. कल्पेश पाटसकर.
७. श्री. आशुतोष गोळे.
८. सौ. आसावरी पंडित.
९. श्री. गिरीश कुलकर्णी.
१०. श्री. सर्वेश उमराणी.

लोकेशन -

कृष्णाबाई मंगल कार्यालय, सोमवार पेठ कराड.

रंगभूषा -

श्री. गणेश सावंत.

वेशभूषा -

१. सौ. आसावरी पंडित.
२. श्री. गणेश सावंत.

छायाचित्रण -

श्री. कल्पेश पाटसकर.

लायटिंग विभाग -

१. श्री. शंतनू देशमुख.
२. .श्री. अद्वैय मुंढे.
३. श्री. आमित पाटील.
४. श्री. महेश पुजारी.
५. श्री. ओमकार पाटील.
६. श्री. गिरीश कुलकर्णी.
७. श्री. सर्वेश उमराणी.

फोटो एडिटिंग -

१. श्री. राजेंद्र बिळासकार.

चित्र (स्केच) -

१. अद्वैय मुंढे.

लेखन विभाग -

- लेखन विभाग प्रमुख - श्री. राजेंद्र आलोणे.

- लेखन -

  चि. हिमांशु आफळे.

- लेख संकलन -

  श्री. दीपक आफळे.

- ध्वनीमुद्रण - सौ. स्वप्नजा बर्वे.
- ध्वनिमुद्रिका -